| | |
|---|---|
| MHKO180005822024 | **<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.२८१/२०२४</u>**<br>महाराष्ट्र सरकार<br>**<u>विरुद्ध</u>**<br>धनंजय भूपाल कांबळे |
| **<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड</u>**<br>**<u>यांचे न्यायालयात</u>**<br>( पिठासीन अधिकारी : श्रीमती व्ही. आर. माने)<br>(<u>निकाल तारीख ०९ जुलै २०२५</u>) | |
| राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर गु.र.क्र.११२/२०२४ तारीख ०६/०४/२०२४.<br>(आरोप - महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये.) | |

**<u>नि.क्र.०९/ब.</u>**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>निरीक्षक - राज्य उत्पादन शुल्क,<br>कोल्हापूर. |

| | |
|---|---|
| अभियोग पक्षातर्फे :- | विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती के. व्ही. परीट. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | धनंजय भुपाल कांबळे.<br>वय : ३८ वर्षे, धंदा : मजूरी,<br>राहणार: हौसिंग सोसायटी, नवे दानवाड,<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |

| | |
|---|---|
| आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ :- | श्रीमती एस. पी. पाटील |

| | |
|---|---|
| **गुन्हा घडला तारीख** | ०६/०४/२०२४ |
| **प्रथम खबर तारीख** | ०६/०४/२०२४ |
| **दोषारोपपत्र दाखल तारीख** | १०/०७/२०२४ |
| **दोषारोप ठेवल्याची तारीख** | ०२/०१/२०२५ |

| | |
|---|---|
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | ०३/०७/२०२५ |
| **न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख** | --- |
| **न्यायनिर्णय जाहीर तारीख** | ०९/०७/२०२५ |
| **शिक्षा झाली असल्यास, त्याची तारीख.** | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनाची तारीख | दोषारोप | शिक्षा झाली अथवा निर्दोष मुक्त केले | शिक्षा | फो.प्र.सं. कलम ४२८ अंतर्गत प्रकरणाच्या सुणावनीदरम्यान कोठडीत व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धनंजय भुपाल कांबळे | फौ.प्र.सं.कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस | ०९/०१/२०२५ | महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई. | आरोपी निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| **साक्षीदार क्रमांक** | **नांव** | **साक्षीदाराचा प्रकार**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, स्वतंत्र साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | रविंद्र राजहंस सोनवणे | पंच साक्षीदार |

**बचाव पक्षाचे अथवा न्यायालयीन साक्षीदार : काही नाही.**

## अभियोग पक्षातर्फे निशाणी यादी

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| ०१ | ०८ | पंचनाम्यावरील पंचाची सही |

**बचाव पक्षाचे/न्यायालयाचे/वस्तू निशाणी यादी : काही नाही.**

## न्यायनिर्णय

( जाहीर दिनांक ०९ जुलै २०२५ )

आरोपी हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमच्या कलम ६५(ई) नुसारच्या अपराधासाठी संपरीक्षाधिन आहे.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की :-</u>**

०२. दि.०६/०४/२०२४ रोजी सकाळी ११.१५ वा. च्या दरम्यान नवे दानवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे ग्रामपंचायत शेजारी मागील बाजूस एका पत्र्याच्या शेडमध्ये आरोपी हा अवैधपणे, बेकायदा, विनापरवाना त्याच्या ताब्यात एका काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास दारु विक्रीचे उद्देशाने बाळगून असताना फिर्यादी विलास रामचंद्र पवार, जवान, राज्य उत्पादन शुल्क विभाग कोल्हापूर यांना मिळून आला. सबब, फिर्यादीने आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.

०३. सदर फिर्याद नुसार आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा क्र.११२/२०२४ नोंदवण्यात आला. गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक एस. एस. गोंदकर यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुद्ध न्यायालयात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये आरोपपत्र दाखल केले.

०४. माझे पुर्वाधीकारी यांनी आरोपीवर नि.०६ प्रमाणे दोषारोप निश्चित करुन ते त्याला वाचून व समजून सांगीतले असता त्याने ते नाकारुन संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने एक पंच साक्षीदार रविंद्र राजहंस सोनवणे यांस तपासले. सदर पंचाने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोग पक्षाने बरेच प्रयत्न करुनही इतर साक्षीदार साक्षीसाठी उपस्थित राहीले नाहीत. तसेच, अभिलेखावर रासायनीक पृथक्करण अहवाल नाही. सबब, अभियोग पक्षाचा पुरावा नि.१ खाली आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुद्ध कोणताही दोषदर्शक पुरावा आला नसल्याने फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवलेले नाही.

०५. उभयतांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाच्या आरोपांवरुन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांवर निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०६/०४/२०२४ रोजी सकाळी ११.१५ वा. च्या दरम्यान नवे दानवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे ग्रामपंचायत शेजारी एका पत्र्याच्या शेडमध्ये उघड्यावर आरोपी हा अवैधपणे, बेकायदा, विनापरवाना गावठी हातभट्टीची दारु विक्रीकरीता बाळगून असताना मिळाल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय? | ...नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अभियोग पक्षाला ही बाब संशयाचे पलिकडे शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर विनापरवाना व अवैधपणे काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास दारु विक्रीच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आला.

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता :-</u>**

०७. प्रस्तुत प्रकरणी अभियोग पक्षाने आरोपी हा बेकायदेशिरपणे विक्री करणेच्या उद्देशाने विना परवाना गावठी हातभट्टीच्या दारुसह मिळून आला, ही बाब संशयाचे पलिकडे शाबीत करणे आवश्यक आहे. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार रविंद्र राजहंस सोनवणे याने त्याच्या पुराव्यात दि.०६/०४/२०२४ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलीसांनी त्याला कोठेही बोलवले नव्हते व तो त्यांच्यासोबत कोठेही गेला नव्हता. त्याच्यासमक्ष कसलीही कारवाई झाली नाही. त्याने पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केली मात्र मजकुराबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. पंच साक्षीदार अभियोग पक्षास मदत करत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यात आला उलटतपासात देखील साक्षीदाराने पोलीसांनी त्याच्या समक्ष पंचनामा तयार करुन मुद्देमाल जप्त केल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे.

०८. आरोपी दारु विक्री करणेच्या उद्देशाने काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास बाळगून होता हे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई खालील गुन्हा शाबीत करण्यासाठी महत्वाचे व आवश्यक घटक असल्याने आरोपीकडून आढळलेले द्रव्य हे दारुच होते हे शाबीत होणे आवश्यक आहे. तथापि, अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अधिकारी वा इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे फिर्याद शाबित झालेली नाही.

०९. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन करता रासायनिक पृथक्करण अहवाल अभिलेखावर नसल्यामुळे जप्त मुद्देमाल दारु होता हे देखील सिध्द झालेले नाही. सबब वरील सर्व तथ्थ, परिस्थिती व एकूण पुरावा यांचे अवलोकन केले असता आरोपी विनापरवाना बेकायदेशीरपणे काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास दारु त्याचे कब्जात बाळगून दारु विक्री करत असल्याचे सिद्ध करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u> :-**

१०. आरोपी त्याचे कब्जात विना परवाना दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होता हे आरोप सिध्द झाले नसलेमुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लि. गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीक मग व पाच काचेचे ग्लास यांची अपिल कालावधीनंतर योग्य निर्गत करणे उचित होईल. सबब, मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आ दे श

१. आरोपी धनंजय भुपाल कांबळे यास महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये असलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये अपिल कालावधीकरीता रक्कम रु.१५,०००/- चा नविन वैयक्तीक बंधपत्र व जामीनबंधपत्र द्यावे.

४. जप्त मुद्देमाल काळ्या रबरी इनरमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लास्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास हे अपिल कालावधीनंतर योग्य ती विल्हेवाट लावणे करीता राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर यांचेकडे पाठवाव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत.)

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2025.08.11 11:00:26 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

ठिकाण: कुरूंदवाड. (श्रीमती व्ही. आर. माने)
दिनांक : ०९/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड.